# लोक महाविद्यालय, वर्धा

## गृहअर्थशास्त्र विभाग

## अहवाल 2017-18

लोक महाविद्यालयातील सत्र-2017-18 या शैक्षणिक सत्रात बी.ए. भाग 1 , 2 व 3 गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थिनीच्या व्यक्तिमत्व विकास तसेच व्यावहारिक व दैनंदिन जीवनासाठी गृहअर्थशास्त्र विषयाचे ज्ञान विद्यार्थिनींना मिळावे या दृष्टीने हा विभाग कार्यरत असतो. या विभागाअंतर्गत विद्यार्थिनी एक सुगृहिणी काशी बनेल तसेच स्वयंरोजगार करून आपले अर्थार्जन कशाप्रकारे करू शकतात याविषयी अनेक उपक्रम घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

दि. 04/10/2017 ला बी.ए. भाग 1 गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने या अभ्यासकअंतर्गत विद्यार्थिनिंमध्ये कलागुणांचाविकास व्हावा या दृष्टीने "इन्व्हलप मेकिंग" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला सौ. कल्पना मिसाळ यांनी विद्यार्थिनींना क्वील्टिंगचे विविध प्रकारचे इन्व्हलप कसे तयार करावे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सौ. सुचित्रा पाटणे , विभाग प्रमुख प्रा. सोनाली बन्सोड , प्रा. मीना ठाकरे, प्रा. प्रीती बैस आदि उपस्थिती होत्या त्याचप्रमाणे विभागाच्या सर्व विद्यार्थिनींनी त्याचा लाभ घेतला.

दि. 16/10/2017 ला गृहअर्थशास्त्र विभाग अंतर्गत " World Food Day" साजरा करण्यात आला. यासाठी विद्यार्थिनींना 'आहारातील पोषणाचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन डॉ. निमा पाटील , कला, वाणिज्य व विज्ञान महा. आर्वी यांनी केले. या मार्गदर्शनाचा लाभ महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र बी.ए. भाग 1,2 व 3 च्या सर्व विद्यार्थिनींनी घेतला. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रा.डॉ. सरीता गणराज , विभागप्रमुख प्रा. सोनाली बन्सोड, प्रा. निलीमा डहाके, प्रा. प्रिती बैस आदी उपस्थित होत्या.

दि. 11/01/2018 ला या विभागातर्फे विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रांगोळी , पाककला व पुष्परचना स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धांना गृहअर्थशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थिनींनी भरभरून प्रतिसाद दिला. यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ. तायडे , उपप्राचार्या प्रा.श्री पाटणे, विभाग प्रमुख प्रा.सौ. सोनाली बन्सोड , प्रा.सौ. बैस, प्रा.ठाकरे तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

दि. 23/02/2018 ला उद्योजक केंद्र प्रदर्शनी भेट ' या अंतर्गत गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने स्थानिक "महालक्ष्मी महिला गृहउद्योग" या लघुउद्योगास भेट देण्यात आली या भेटी अंतर्गत हळद , तिखट व मसाले कश्याप्रकारे तयार केले जाते. तसेच अश्याप्रकारचे लघुउद्योग सुरू करण्यासाठी काय करावे? त्यासाठी लागणारा कच्चा माल , यंत्र सामुग्री , कर्ज सुविधा, तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया केले जाणारे परिश्रम म्हणजे स्वयंरोजगाराची संपूर्ण मार्गदर्शक तत्वे या संबंधी विद्यार्थिनींना श्री. राहुल सुपारे तसेच श्री नितिन कुंभलवार सहप्रायोजक , यांनी मार्गदर्शन केले . या भेटीमध्ये गृहअर्थशास्त्र विभागाच्या 32 विद्यार्थिनी तसेच गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सोनाली बन्सोड , प्रा. प्रीती बैस , प्रा. डॉ. सरीता गणराज , प्रा. निलीमा डहाके यांचा सहभाग होता. या भेटीच्या यशस्वीतेकरीता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ. तायडे, तसेच सर्व प्राध्यापक वृंदाचे सहकार्य लाभले.

**प्रा.सौ.सोनाली रा. बन्सोड**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोक महाविद्यालयं, वर्धा